प्रधानमंत्री मातृ वंदना या योजनेची
राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः क्रमांक : मासका-२०१७/प्र.क्र.४९३/कुक

नविन मंत्रालय १० वा मजला, गो.ते.रुग्णालय,संकुल इमारत
लो.टि.मार्ग, मुंबई - ४०० ००१
तारीख: ०८ **डिसेंबर, २०१७**

वाचा -

1. **केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाचे अ.शा.पत्र क्र.आय.जी. १३/१/२०१७ - ओ/ओ युएस (इं.गां.मा.सु.यो.), दिनांक १२ जानेवारी, २०१७**

प्रस्तावना :-

भारतातील दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्यापर्यंत मजूरीसाठी काम करावे लागते. तसेच प्रसुतीनंतर शारिरीक क्षमता नसतानाही मजूरीसाठी तात्काळ काम करावे लागते. यामुळे अशा गर्भवती महिला व माता कुपोषित राहून त्यांचे व त्यांच्या नवजात बालकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. यामुळे देशाच्या मातामृत्यू व बालमृत्यू दरात वाढ होते. सबब माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टिने गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करुन त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी व जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचेही आरोग्य सुधारावे आणि मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रित रहावा यासाठी केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाने प्रधानमंत्री मातृ वंदना ही नवीन योजना संपूर्ण देशात दिनांक ०१ जानेवारी, २०१७ पासून कार्यान्वित करण्यास दि.१२ जानेवारी,२०१७ च्या आदेशान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन होता. मंत्रिमंडळाच्या दि.२१ /११/२०१७ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता मिळाली त्याअनुषंगाने राज्यात प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची अंमलबजावणी करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:

मातामृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्याच्या दृष्टीने संपूर्ण देशात आणि राज्यातील अमरावती व भंडारा या दोन जिल्हयांमध्ये महिला व बाल कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेली इंदिरा गांधी मातृत्व सहयोग ही १००% केंद्र पुरस्कृत योजना बंद करुन सदर योजनेचे शिल्लक अनुदान

प्रधानमंत्री मातृ वंदना या केंद्र पुरस्कृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी उघडण्यात आलेल्या Escrow Account मध्ये जमा करण्यात यावा.

२. मानव विकास कार्यक्रमातंर्गत पहिल्या बाळंतपणानंतर महिलेला बुडीत मजुरी देण्याच्या योजनेच्या निकषामध्ये नियोजन विभागाने प्रस्तुत नवीन योजनेच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे सुधारणा करण्याचा निर्णय घ्यावा.

३. गर्भवती महिलांची नोंदणी, त्यांना प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर आरोग्य सोयी सुविधा देऊन नवजात बालकांच्या आरोग्याची देखभाल करण्याची जबाबदारी आरोग्य विभागाची असल्याने प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची अंमलबजावणी राज्यात प्रस्तूत शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून आरोग्य विभागामार्फत केली जाईल. सदर योजना केंद्र व राज्य शासन यांच्या सहभागाने राबविण्यात येणार असून या योजनेत केंद्र शासनाचा ६०% तर राज्य शासनाचा ४०% सहभाग राहाणार आहे.

४. **<u>योजनेचे वैशिष्टये आणि अंमलबजावणी</u>**:-

१) केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना, निकष, कार्यपध्दती व विकसीत केलेल्या संगणक प्रणालीव्दारे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेमार्फत प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची अंमलजावणी केली जाईल. सबब, त्यांना या योजनेसाठी राज्यस्तरीय समन्वय अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार त्यांच्या नांवे Escrow Bank Account खाते उघडण्यात यावे.

३) सदर योजना एकवेळ आर्थिक लाभाची असून पहिल्या जिवीत अपत्यापूर्तीच मर्यादित आहे व सदर लाभ एकदाच घेता येईल.

४) नैसर्गिक गर्भपात झाल्यास किंवा मृत बालक जन्मल्यास त्या टप्पापूरताच लाभ एकदाच अनुज्ञेय राहिल.

५) या योजनेत दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील लाभार्थ्यांचा समावेश असला तरी वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

६) शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थेत गर्भवती महिलांना नोंदणी करणे आवश्यक आहे.

७) लाभाची रक्कम लाभार्थी महिलेच्या आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफीस मधील खात्यात तीन हप्त्यात थेट जमा केली जाईल (DBT) - Through Public Finance Management System

८) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी विहित केलेली कंत्राटी पदे शासनाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार भरण्यात येतील.

५. योजनेंतर्गत अनुज्ञेय लाभ व त्यांचे वितरण :-

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलेस रु.५०००/- एवढी रक्कम आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफीस मधील खात्यात (DBT) खालील तीन टप्यात जमा केली जाईल.

अ.क्र.	लाभ द्यावयाचे टप्पे	लाभाचे निकष
१	१ ला हप्ता रु.१०००/-	मासीक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून १५० दिवसात गर्भधारणा नोंदणी केल्यानंतर प्राप्त होईल.
२	२ रा हप्ता रु.२०००/-	किमान एकदा प्रसवपुर्व तपासणी केल्यास गर्भधारणेचे सहा महिने पूर्ण झाल्यानंतर दुसरा हप्ता लाभार्थीच्या खात्यात जमा केला जाईल.
३	३ रा हप्ता रु.२०००/-	प्रसुतीनंतर झालेल्या अपत्याची जन्मनोंदणी व बालकास बीसीजी, ओपीव्ही, डीपीटी आणि हिपॅटॅटीस बी वा त्या अनुषंगीक लसीकरणाचा पहिला खुराक दिल्यानंतर तिसरा हप्ता लाभार्थीच्या खात्यात जमा केला जाईल.

लाभार्थी महिलेची शासकीय रुग्णालयात प्रसुती झाल्यास त्यांना जननी सुरक्षा योजनेअंतर्गत रु. ७००/- (ग्रामीण भागात) व रु. ६००/- (शहरी भागात) लाभ अनुज्ञेय राहील.

६. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या राज्य तथा क्षेत्रिय स्तरावरील, गावपातळीवरील अंमलबजावणीच्या कार्यप्रणालीबाबत शासन निर्णय स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात येत आहे.

७. लाभार्थी संख्येच्या प्रमाणात राज्य शासनाच्या हिशाची ४० टक्के खर्चाची वार्षिक तरतूद या प्रयोजनासाठी संबंधित नवीन लेखाशिर्षात अर्थसंकल्पित करण्यात येईल. नियोजन विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग सदर योजनेच्या प्रगतीचा आढावा घेऊन वित्त व नियोजन

विभागाच्या सहमतीने राज्य शासनाच्या हिश्याची (४०%) (General / SCP / TSP) आवश्यक निधी या प्रयोजनासाठी आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक यांच्या नावे उघडण्यात आलेल्या Escrow Account मध्ये जमा करेल. केंद्र शासनाच्या हिश्याचा निधी देखील उक्त खात्यात जमा केला जाईल. सदर खात्यातून निर्धारीत प्रयोजनासाठी खर्च भागविण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्रमांक १६३/१४७२, दिनांक ०६.११.२०१७ व क्रमांक - संकीर्ण -२०१७/प्र.क्र.२८/व्यय-१३, दि.८.११.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०८१३३५४५१३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2017.12.08 17:12:26 +05'30'

(वर्षा मुं.भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई
२. मा.मंत्री (साआवि), मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री,/वित्त/नियोजन), मंत्रालय,मुंबई
४. मा.मंत्री (आदिवासी विकास विभाग), मंत्रालय,मुंबई
५. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग), मंत्रालय,मुंबई
६. मा.राज्यमंत्री,(साआवि), मंत्रालय,मुंबई
७. मा.अमुस (वित्त विभाग), मंत्रालय,मुंबई
८. मा.प्रधान सचिव (साआवि), मंत्रालय, मुंबई

९. मा.प्र.स. (नियोजन), मंत्रालय,मुंबई

१०.मा.प्र.स. (आदिवासी वि.वि.), मंत्रालय,मुंबई

११.मा.प्र.स. (महिला व बाल विकास वि.), मंत्रालय,मुंबई

१२.मा.प्र.स. (सामाजिक न्याय व विशेष सहाय), मंत्रालय,मुंबई

१३.महालेखापाल,महाराष्ट्र -१/२ (लेखापरीक्षा/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर

१४.अधिदान व लेखा कोषागार, मुंबई.

१५.आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

१६.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

१७.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे

१८. निवासी लेखाधिकारी, मुंबई

१९. सचिव,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, केंद्र शासन, निमार्ण भवन,नवी, दिल्ली

२०.विभागीय संचालक (कु.क.), ८२/२, पर्वती, पहिला माळा, दर्पण बिल्डींग, सहकार नगर, पुणे

२१.आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

२२.सह संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

२३.उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)

२४. जिल्हा शल्य चिकित्सक , सामान्य रूग्णालय (सर्व)

२५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

२६. वित्त विभाग (व्यय-१३) मंत्रालय, मुंबई

२७.निवडनस्ती (कु.क.)